Arts, Science & Commerce, College
Mokhada

## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Sanshodhak (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | संशोधक (print only) |
| **Publication Language** | English , Marathi |
| **Publisher** | Itihasacharya V. K. Rajwade Sanshodhan Mandal |
| **ISSN** | 2394-5990 |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Arts and Humanities (all) |
| **Focus Subject** | History , Literature and Literary Theory |
| **UGC-CARE coverage year** | from April-2021 to Present |




Copyright © 2022 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ पुरवणी विशेषांक





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

50

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

## पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ४

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक :**

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No. 2394-5990


१९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानव मुक्तीचे लढे - डॉ.विजय रेवजे, सोलापूर ------------ ८३

२० डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवादी दृष्टीकोण
- डॉ.वासुदेव डोंगरदिवे, विक्रमगड, जि. पालघर ------------------------------ ८५

२१ महात्मा फुले यांचे पददलितांच्या शिक्षणासंबंधीचे योगदान - प्रा.आनंद शिंदे, सोलापूर ------- ९०

२२ महात्मा जोतीराव फुले - एक दृष्टा और स्रष्टा युगपुरुष - डॉ.दत्तात्रय अनारसे, माढा, जि.सोलापूर - ९३

२३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बहिष्कृत हितकारिणी सभा
- डॉ.दिगंबर वाघमारे, टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर ------------------------- ९६

२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सशक्तिकरण
- डॉ.दिलीप बिराजदार, माकणी, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद-------------------- १०१

२५ महात्मा जोतीराव फुले यांच्या कुळंबीण' अखंडातील जातीव्यवस्था व स्त्री शोषणाचा विचार
- डॉ.दिनकर मुरकुटे, हडपसर, पुणे ------------------------------- १०५

२६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक व कृषिविषयक विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास
- डॉ.स्मीता पाकधाने, नाशिक ----------------------------------- १०९

२७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बौद्ध धम्म प्रभाव आणि वारसा, सामजिक अस्तित्वाचा पर्यायी समृद्ध मार्ग
- डॉ.प्रभाकर कोळेकर, सोलापूर---------------------------------- ११६

२८ आंबेडकरवादी इतिहास पद्धतीचे वैचारिक तत्त्वज्ञान व त्याची मिमांसा
- डॉ.प्रविण बोरकर, उल्हासनगर ------------------------------- १२३

२९ आधुनिक भारताच्या सामाजिक चळवळीचा दीपस्तंभ महात्मा फुले कृत सत्यशोधक समाज
- डॉ.राजेंद्र गायकवाड, टेंभुर्णी, . ------------------------------ १२९

३० महात्मा जोतिराव फुले यांचे सत्यशोधक समाजाबाबतचे विचार
- डॉ. सुशिल शिंदे, पंढरपूर ---------------------------------- १३१

३१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित चळवळीतील योगदान
- डॉ.संजीव बोधे, खटाव, जि.सातारा ---------------------------- १३६

३२ महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाज सुधारणाविषयक विचार
- प्रा.दत्तू शेंडे, कर्जत, जि.अहमदनगर. --------------------------------- १३९

३३ आधुनिक भारताच्या संविधान निर्मितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान
- डॉ.सुभाष वाघमारे, सातारा. ---------------------------------------- १४१

३४ डॉ. बाबासाहब अंबेडकर के वैचारिक परिप्रेक्ष्य में हिंदी दलित आत्मकथा साहित्य
- डॉ.प्रमोद परदेशी, कर्जत, जि.अहमदनगर. --------------------------- १४५

३५ समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक महात्मा फुले यांचे विचार व कार्य : एक अभ्यास
- डॉ.गौतम ढाले, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर. -------------------------- १४९

३६ महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांच्या प्रगतीबाबत विचार - डॉ.घनश्याम महाडीक, अमरावती ---- १५४

३७ महात्मा फुले यांचे भारतीय शेती व शेतकऱ्याविषयीचे विचार
- १) डॉ.उद्धव घोडके, पुणे; २) डॉ.पांडुरंग लोहोटे, पुणे. ------------------- १५६

३८ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय समाजाच्या शिक्षणाचा हक्क
- डॉ.संतोष जाधव, मोखाडा, जि.पालघर. ------------------------------ १५९




52

ISSN No. 2394-5990

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवादी दृष्टीकोण

डॉ. वासुदेव डोंगरदिवे ता. विक्रमगड जि. पालघर, (महाराष्ट्र)
मो.क्र.९७६६२५५४४२ Email no. drvasudon@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतामध्ये राष्ट्रवादाच्या जाणिवा प्रामुख्याने समाजसुधारणा चळवळीतून सर्वप्रथम द्दुगोचर झालेल्या आहे. डॉ. आंबेडकरांच्या जीवनात काही महत्वपूर्ण घटना घडल्यात, त्यांच्या जीवनात नव चिंतानशीलता आकारास आली. यामुळेच भारतातील वंचित वर्गाच्या ठिकाणी त्यांना अद्वितीय असे स्थान प्राप्त झाले आहे. सर्व सामान्यांना कोणतेही स्थान नव्हते. हजारो वर्षांपासून दलित, वंचित वर्गाच्या बऱ्याच मोठ्या समस्या होत्या. सार्वजणीक जीवनात त्यांना कोणतेही महत्वाचे स्थान नव्हते. ब्रिटीशांच्या भारतीय प्रवेशामुळे परंपरागत समाजात, ग्रामीण क्षेत्रात शहरीकरण औद्योगीकरण तसेच पश्चिमीकरन या प्रक्रियांना स्थान लाभले. सर्वत्र भौतिक सुविधांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सहाजिकच होणाऱ्या सामाजिक परिवर्तना बरोबरव्ह राजकीय परिवर्तन घडत होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभामध्ये भारतीय समाजात विवेक, न्यायव्यवस्थेवर आधारित भारतीय समाजात नव्या मानवी मूल्यांचा उदय झपाट्याने घडत होता. ह्या बदलामागे राजकीय जीवनात नवजागृती चा उषाकाल घडू लागला. असे असूनही दलित वर्गांच्या कोणत्याही समस्यांना सोडविण्याचे प्रयत्न अशातच डॉ. आंबेडकरांनी ह्या वर्गामध्ये नविन राजकीय भूमिका स्वीकारलेली आहे.[१] आधुनिक राजकीय विचार प्रणाली मधील एक अत्यंत महत्वाचा आणि आधारभूत विचार म्हणून राष्ट्रवादाचा विचार केला जातो. आज जगात जवळपास एकशे पंच्यांशी स्वतंत्र आणि सार्वभौम राज्ये अस्तित्वात असून त्यातील बहुसंख्य राज्यांच्या उदयामागे राष्ट्रवादी विचार ही एक प्रेरणा आहे. आधुनिक जगाच्या राज्य व्यवस्थेचे स्वरूप, राष्ट्रा राज्ये आहे. म्हणजे त्यांच्यातील शासन संस्थांचे स्वरूप जारी वेगवेगळे असके तरी त्या त्या राज्यांमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये आपण एक आहोत अशी मूलभूत भावना अस्तित्वात असते.राष्ट्रवाद ही आधुनिक काळातील एक संकल्पना आहे. पश्चिम युरोपात १६ व्या शतकात उदयास आलेल्या या विचारांना १८ व्या, १९ व्या शतकात स्थैर्य प्राप्त झाले.[२]

**सामाजिक भूमिकेचा उदय –**

भारतीय जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांचे आर्थिक दृष्टिकोनातून निर्मूलन करणारे डॉ. आंबेडकर हेबहुधा पहिलेच अर्थतज्ञ होते. सामाजिक समतेचे ज्वलंत व मूलगामी विचार त्यांनी लिहिलेल्या दोन ग्रंथांमधून प्रतिबिंबित झालेले आपणास दिसून येतात. पैकी, 'जातीव्यवस्थेचे निर्मूलन' (१९३६), दुसरे- 'कॉंग्रेसने व गांधीनी अस्पृश्यांसाठी काय केले'?(१९४४)सन १९३६ मध्ये लाहोर अधिवेशनात डॉ. आंबेडकरांनी केलेले भाषण पुस्तक रूपात प्रकाशित केले, त्या लिखाणावर 'म. गंधिनी हरिजन' टीका केल्यात. (जुलै-१९३६) तेंव्हा डॉ. आंबेडकरांनी गांधीजींच्या आक्षेपास सडेतोड उत्तर दिलेले आहे.[३] सामाजिक परंपरेनुसार हिंदू धर्मानि डोक्यावर शेंडी राखणे, शरीरावरील शुक्ष्म जिवाजंतुणा संपविण्यासाठी गंगेत स्नान करावे, सूर्याच्या व चंद्राच्या गुरुत्वाकर्षण शक्तीची प्रतिक्रिया म्हणून दर अमावस्या व पौर्णिमा ला उपवास करावे, संध्याकाळी पृथ्वी उत्सर्जित करीत असलेल्या विषारी वायूंचे ज्वलन करण्यासाठी दिवाळीतील दिव्यांचा झगमगाट करावा असा तर्कशुद्ध व मतलबी तरीही भोळ्यांभाबड्या जनतेच्या मनाला भुरळ घालणाऱ्या युक्तिवादाची बजबजपुरी अशा भ्रामक युक्तिवादावर डॉ. आंबेडकरांनी चढविलेला प्रखर हल्ला म्हणजे त्यांच्या ठिकाणी असणारा सामाजिक राष्ट्रवाद होय, असेच आपणास म्हणता येईल.[४]

ज्याला प्राचीन भारताचा हिंदू इतिहास मानले जाते, तो भारतीय राष्ट्रवादाचा आधार होता. प्राचीन हिंदू इतिहासाची समीक्षा बाबांसाहेब आंबेडकरांनी मूलगामी स्वरूपात केली आहे. इतिहासाचे इतरविरोध एकत्व त्यांनी नाकारले, 'रिव्होल्युशन अँडकाउंटर रीव्होल्युशन' या ग्रंथांमध्ये त्यांनी हिंदू इतिहास संस्कृतीच्या एकत्वचा प्रतिवाद करून ते म्हणतात, 'भारताची संस्कृति एक असून इतिहासक्रमात ती एकसमान राहिली आहे, असे सर्व सामान्यरीत्या मानले जाते. ब्राम्हणवाद, बौद्धवाद व जैनवाद या निरनिराळ्या अवस्था आहेत, आणि त्यांच्यामध्ये कोणताही मूलभूत विरोध नाही अशी ही भूमिका आहे. भारतीय राजकारणात जे संघर्ष झाले, ते शुद्ध राजकीय व घराण्यांचे समजले गेले. त्यांचे सामाजिक व आध्यात्मिक महत्त्व लक्षात घेतले नाहीत. अशा दृष्टिकोनांमध्ये व अशा इतिहास लेखन पद्धतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे'.[५] प्रथम पासूनच

डॉ.आंबेडकरांना लोकशाही प्रती विशेष आस्था आहे. मानवी जीवनाची एक पद्धती म्हणजे लोकशाही होय, असा त्यांचा विश्वास होता.[६] डॉ. बाबसाहेबांनी दलित, वंचित जनतेच्या विकासाकरिता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या द्रोह स्वीकारलेला होता. स्वातंत्र्य पूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये त्यांनी धार्मिक सुधारणांची आलोचना केली आहे. तसेच राजकारणांमध्ये एका निश्चित दृष्टिकोनाचा अवलंब करणारे म्हणून त्यांची विशेष ख्याती होती. मानवी जीवनातील सर्वच स्तरावर त्यांनी मानवी मुक्तीचा यशस्वी लढा देणारे योद्धा असेच त्यांच्या बाबतीत म्हणता येईल.[७] डॉ. आंबेडकर म्हणतात की, राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचा आधार असल्याशिवाय ती कधीही टिकू शकत नाही. देशातील राजकीय पटलांमध्ये समावेश केल्याशिवाय तसेच प्रत्यक्ष राजकारणात समावेश झाल्यावरच आपणास ध्येय प्राप्तीचा उद्देश प्राप्त होउ शकत नाहीत. अशा महत्वपूर्ण उद्देशाकरिता डॉ. आंबेडकरांनी १९३५ च्या कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.[८] सामाजिक एक्य बरोबरच राजकीय एक्य सुद्धा महत्वाचे आहे. बऱ्याच पाश्चत्य विचारवंतांनी राष्ट्रवादी भूमिकेला त्याग करण्याचे प्रतिपादन केले आहे.

**पाच्यात्यांचा दृष्टिकोण –**

राष्ट्रवादी भूमिकेबद्दल पाच्यात्य विचारवंतांनी नकारात्मक भूमिका स्वीकारलेली दिसते. सिडने ब्रुक्स, नॉर्मन अनवेल च्या मते, राष्ट्रवाद म्हणजे शांतता व मानवतावादाला असणारा एक गंभीर धोका होय. अशा प्रकारे पाच्यात्य विचारवंतांचा हा प्रतिकूल दृष्टिकोण होय. मात्र डॉ. आंबेडकरांच्या मते, राष्ट्रवाद म्हणजे एक परिणामकारक शक्ति होय.[९] आंबेडकरांच्या ह्या राष्ट्रवादी भूमिकेला काही अभ्यासकांनी आराजकीय दृष्टिकोण असे म्हटले आहे.कारण डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश राजवती अंतर्गत आपल्या दलित बांधवांच्या विशेष हकांचा पुरस्कार केलेला आहे.[१०] डॉ. आंबेडकर यांनी हिंदू धर्माची समाजशास्त्रीय चिकित्सा केली आहे. डॉ.आंबेडकरांनी जातिसंस्थेचे उच्चाटन; या भाषणात म्हटल्यानुसार, हिंदू धर्म म्हणजे भाकड कथा होय. म्हणून हिंदू ही एक संघ राष्ट्र होउ शकत नाही. हिंदू धर्मात प्रतेक जातीचे स्वतंत्र अस्तित्व आहे. म्हणून त्यात एकसंघतेचा अभाव आहे. म्हणून हिंदू धर्म व जात या दोन्ही राष्टनिर्मितीस मारक आहेत.[११] डॉ. आंबेडकरांनी जाती प्रथा म्हणजे सामाजिक विकासातील मार्ग अवरुद्ध करणे होय. यासाठी जाती प्रथांचे उन्मूलन करणे आवश्यक आहे. जाती प्रथा म्हणजे एकप्रकारे श्रेणीबद्ध संघठन श्रेणीबद्धतेमुळे काही श्रमिक संघटनेचा स्थर उच्च प्रतीचा आहे तर काहींचा स्थरनिम्न प्रकारचा आहे. अर्थात सामाजिक दृष्ट्या ही एक विषमता असून यास राष्ट्रवाद म्हणता येणार नाही.[१२]

**मानवतावादाचा अवलंब –**

डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनात तीन महापुरुषांना आदर्श स्थान दिले आहे. ज्यामध्ये प्रथम, गौतम बुद्ध, द्वितीय– संत कबीर, आणि तिसरे– म. ज्योतिराव फुले. अस्पृश्य वर्गाचे संघठण करणेआणि शिक्षणाचा प्रसार करणे या मूल्यांची त्यांनी जोपासना केल. या बरोबरच बुकर टी वाशिगटनआणि जॉन ड्युई अशा पाश्चत्य विचारवंतांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. आधुनिक आणि सभ्य जीवन पद्धतीचा त्यांना अनुभव अमेरिका व इंग्लंड मध्ये उच्च शिक्षण घेताना आला आहे. पाच्याती शिक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून उदारवाद व राष्ट्रवादाचाही परिचय झाला. सहाजिकच त्यांनी सत्याग्रह पद्धतीमध्ये विविध आंदोलने केलीत. यामध्ये त्यांनी उदार राष्ट्रवादी तत्वांचा अवलंब केला. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांना विविध साधने आणि प्रभावशाली तत्वाच्या माध्यमातून समाज उद्धार आणि नव भारताच्या पूननिर्माणकार्यातील एक महान योद्धा म्हणून ओळखले जातात.[१३] डॉ. आंबेडकरांनी उदारवादी विचारधारेतून त्यांनी जीवन, संपत्ति, आणि स्वातंत्र्याच्या अधिकारांचा अवलंब केला. सार्वजनिक कार्याच्या विविध क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केले आहे. अस्पृश्य वर्गाच्या उधारार्थ राजकीय व सामाजिक कार्यात अत्यंत उत्साहाने व धैर्याने अविश्रांत श्रम केलेत. सायमन कमिशन बरोबर सहकार्य करण्यासाठी मुंबई लेजिसलेटीव्ह कौन्सिल ने नेमलेल्या कामिटीचे सभासदत्व स्वीकारून मंतपत्रिकातील भूमीका महत्वाची मानल्या जाते.येथे त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या कुशल राष्ट्रवादी वृत्तीचा आपणास परिचय येतो.[१४]

**स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाला प्राधान्य –**

डॉ. आंबेडकरांनी कामगार हिताचे समर्थन करण्यात सुद्धा त्यांच्या राष्ट्रवादी भूमिकेचा प्रत्यय येतो. कॉंग्रेस सरकारने मुंबई कायदे मंडळात कामगारांच्या नागरिक स्वातंत्र्यस विघातक अशा ट्रेड डिसप्यूट बिलाच्या वाचन प्रसंगी १२ सप्टेंबर १९३८ रोजी अत्यंत जोरदार मुद्दे मांडून आपले विचार व्यक्त केलेत.[१५] आपल्या देशाचे सर्व श्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांना डॉ. आंबेडकर ही त्यांच्या काळातील सर्व श्रेष्ठ बुद्धिवान वाटत होते. त्याचवेळी जगातील

एका थोर राज्यशास्त्रज्ञाला हेराल्ड लॉस्की यांनाडॉ. आंबेडकर म्हणजे छुपे क्रांतिकारक वाटत होते. डॉ. आंबेडकर म्हणजे भारताच्या इतिहासाने पाहिलेले शेवटचे आणि श्रेष्ठ दर्जाचे समाजक्रांतिकारक होते. पश्चिमेकडे झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीने, रेनेसा ने ही जग पूर्ण नवे केले आहे, अशी डॉ.आंबेडकरांची धारणा होती.[१६] डॉ. आंबेडकर म्हणतात, 'जातीव्यवस्थेवर आधारित असणाऱ्या हिंदू समाजदेशाचे शोषण व असमानतेला पूरक भूमिका स्वीकारीत आहे.' यातुनच त्यांनी २४ सप्टेंबर १९२७ रोजी मनुस्मृतिचे जाहीर दहन केले आहे. सामाजिक स्थैर्य कायम ठेवण्यासाठी त्यांनी जाती तसेच श्रेणिवाद यास प्रोत्साहन देणाऱ्या सामाजिक नियमनांचा आधार काढून घ्यावे, तसेच शास्त्रातील ईश्वरी भूमिकेला समूळ नष्ट करावे. अशा प्रकारे सामाजिक समानता व स्वतंत्रता प्रस्थापित करण्याचा संघर्ष दोन हजार पाचशे वर्षांपूर्वी बुद्धा ने आरंभलेला होता, तोच संघर्ष डॉ.आंबेडकरांनी पुनर्जीवित केलेला आहे., असेच आपणास त्यांच्या राष्ट्रवादी भूमिकेतून निदर्शनात येतो.[१७] २० जुलै १९२९ रोजी 'बहिष्कृत हितकारणी सभा' ची स्थापना करून अस्पृश्य वर्गाचे शिक्षण व आर्थिक स्थैर्य अशीउद्देशपूर्ण भूमिका घेण्यात आली.[१८]

**मूल्यमापन -**

'थॉट्स ऑान पाकीस्थान', 'स्टेटस अँड मॉयनारीटीज, ॲनहीलेशन ऑफ कास्ट, रानडे, गांधी आणि जिना' ह्या आपल्या ग्रंथांमधून तसेच काही प्रसंगोपात्त केलेल्या भाषणांमधून डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रवादा संदर्भात विचार व्यक्त झालेले आहेत. राष्ट्रवाद ही व्यक्तिनिष्ठ भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी आहे. तिचे सामर्थ्य अगाध असून तिची मुळे बळकट आहेत. मोठमोठी साम्राज्य ती उलथून पाडू शकते, आणि कुणी कितिथी प्रयत्न केला तरी तिचे उच्चाटन होणे अशक्यप्राय आहे. कुणी तिला विवेकशून्य प्रवृत्ती म्हणावे वा शुद्ध भ्रामक कल्पना म्हणावे, एक मात्र सत्य उरतेच ते म्हणजे, ती एक अतिप्रबल शक्ति आहे.[१९] नेतृत्व आणि विचारांच्या बरोबरच १९ व्या शतकातील औद्योगीक क्रांतीने जगातील सर्वच लहान मोठ्या बदलांना सामोरे जावे लागले. त्यातूनच राष्ट्रवादाचा विकास व प्रसार झपाट्याने झाला. त्याचवेळी या बदलांना डॉ. आंबेडकरांनी समाज व राष्ट्र विकासाकरिता हा विचार आत्मसात करून त्याला प्रत्यक्ष रूप देण्यास पुढाकार घेतला.[२०]

**तळ टिपा -**

१) संपा.- त्यागी रुचि, आधुनिक भारत का राजनैतिक चिंतन, हिन्दी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, १० केवेलरी लाइन, दिल्ली- ११० ००७, द्वितीय पुनर्मुद्रण- २०१५ , पृ. क्र., २६५.

२) डॉ. जाधव नरेंद्र, डॉ. आंबेडकर, आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन-उषा वाघ, ८६१/१, सदाशिव पेठ, पुणे- ४११ ०३०, प्रथमावृत्ती- ६ डिसेंबर-१९९२, पृ. क्र., ६४.

३) तत्रैव, प्रू. क्र.,६५

४) बगाडे उमेश, फुले- आंबेडकरांचा राष्ट्रवाद, क्रांतीज्योती संवित्रीबाई फुले प्रकाशन, प्रा. रणजीत परदेशी, काळा मारुती चौक, मु,ता. यवले, जी. नाशिक, द्वितीय आवृत्ती-६ डिसेंबर २००२, पृ. क्र., १०.

५) नागर पुरुषोत्तम,आधुनिक भारतीय सामाजिक एव राजनीतीक चिंतन,राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी., प्लॉटन. १, झालाणा संस्थानिक क्षेत्र, प्रू. क्र., ६९१

६) तत्रैव, प्रू. क्र.,६९

७) प्रा. डॉ. चाटसे, डॉ. खिल्लारे, डॉ. कांबळे, प्रा. वनंजे श्रावण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौरव ग्रंथ, एज्युकेशनल पब्लिशिंअर्स अँड डीस्ट्रिब्युटर्स, पो. बा. न. १३१, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जूलै-२०२०, पृ. क्र., ४३.

८) डॉ. बाचल वी. मा., गोळवलकर, प्रा. वारांडकर, प्रा. क्षीरसागर, भारतीय राजकीय विचारवंत, के सागर प्रकाशन, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, सुवर्ण शिल्प, ४४४/१ शनिवार पेठ, दक्षिणाभिमुख मारुती मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०, तिसरी आवृत्ती-२००९, पृ. क्र.,३९३.

९) तत्रैव, प्रू. क्र., ३९४

१०) गायकवाड सुप्रिया, राष्ट्रवाद, जमातवाद आणि स्त्रिया, बीज प्रकाशन गृह, दा.रा. झुंजारे, रोकडिया नगर, शेगांव, जी. बुलढाणा- ४४४२०३, प्रका. क्र. १२, प्रथम आवृत्ती- २६ मे २०२१, पृ. क्र., २४.

११) संपादक- रॉय हिमांशु, भारत मे उपनीवेशवाद और राष्ट्रवाद, हिन्दी माध्यमं कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, १०, केवेलरी लाइन, दिल्ली- ११० ००७, प्रथम संस्करण- जनवरी-२०१३, पृ. क्र. ११५.

१२) शर्मा बी. एन., राम कृष्णदत्त शर्मा, सविता शर्मा, भारतीय राजनीतीक विचारक, रावत पब्लिशिंग, प्रेम रावत, सत्यम अपार्टमेंट, सेक्शन-३, जवाहर नगर,

जयपुर-३०२ ००४, पुनरावृत्ति-२०१९, पृ. क्र., ३६८

१३) संपादक- मून वसंत, प्रा. गोडघाटे, डॉ. कासरे, नरके हरी, कांबळे, द्विती आवृत्ती- प्रा. डोळस अविनाश, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-१, १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र- साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्र. १८, मंत्रालया समोर, मुंबई- ४०० ०२१, द्वितीय आवृत्ती- १४ एप्रिल-२०१६, पृ. क्र., ४७०..

१४) संपादक- मून वसंत, प्रा. गोडघाटे, डॉ. कासरे, नरके हरी, कांबळे, द्विती आवृत्ती- प्रा. डोळस अविनाश, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-२, १९३७ ते १९४५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र- साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्र. १८, मंत्रालया समोर, मुंबई- ४०० ०२१, द्वितीय आवृत्ती,- १४ एप्रिल-२०१६, पृ. क्र. १९७.

१५) डॉ. कसबे रावसाहेब, धर्म : मानवी संस्कृति व विकास, लोकवाडमय गृह, बहुपेक्ष गुप्ता भवन, ८५,सयाणी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५, पांचवी आवृत्ती, जानेवारी-२०१७, पृ. क्र., २६.

१६) संपादक- रॉय हिमांशु, भारत मे उपनीवेशवाद और राष्ट्रवाद, हिन्दी माध्यमं कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, १०, केवेलरी लाइन, दिल्ली- ११० ००७, प्रथम संस्करण- जनवरी-२०१३, पृ. क्र. ११६.

१७) संपा- त्यागी रुचि, आधुनिक भारत का राजनीतीक चिंतन : एक विमर्श, पृ. क्र. २५५.

१८) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुणीक भारतातील राजकीय विचार, पिंपाळापुरे अँड कं. पब्लीशर्स, मनोहर पिंपळापुरे,हिंदू मुलींचे शाळेजवळ, महाल, नागपूर-४४००३२, प्रका. क्र. २४१, पृ. क्र. ८२७.

१९) डॉ. दाते सुनील, डॉ. ढोबळे रमेश, प्रमुख राजकीय विचार्यप्रणाली, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रका. क्र. ६१, द्वितीय आवृत्ती- जून २०००, पृ. क्र. १११.

**संदर्भ ग्रंथ सूची (मराठी) :**

१) बगाडे उमेश, फुले- आंबेडकरांचा राष्ट्रवाद, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, प्रा. रणजीत परदेशी, काळा मारुती चौक, मु.ता. यवले, जि. नाशिक, द्वितीय आवृत्ती-६ डिसेंबर २००२.

२) डॉ. बाचल वी. मा., गोळवलकर, प्रा. वारांडकर, प्रा.क्षीरसागर, भारतीय राजकीय विचारवंत, के सागर प्रकाशन, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, सुवर्ण शिल्प, ४४४/१, शनिवार पेठ, दक्षिणाभिमुख मारुती मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०, तिसरी आवृत्ती-२००९.

३) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुणीक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अँड कं. पब्लीशर्स मनोहर पिंपळापुरे, हिंदू मुलींचे शाळेजवळ, महाल, नागपूर-४४००३२ प्रका. क्र.२४१.

४) डॉ. कसबे रावसाहेब, धर्म : मानवी संस्कृति व विकास, लोकवाडमय गृह, भुपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५, पाचवी आवृत्ती, जानेवारी-२०१७.

५) संपादक प्रा. कसबे विजय, राजकीय तत्वप्रणाली- सिद्धांन्त आणि व्यवहार, प्रका. प्राचार्य शिवाजीराव भोर, सचिव- रावसाहेब शिंदे षष्ट्यब्दीपूर्ती गौरव समिति, श्रीरामपूर- ४१३७०९, प्रथमावृत्ती-जानेवारी १९८९, पुणे.

६) अनुवाद- कांबळे बी. सी., अस्पृश्य मुळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे झाले?- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, उषा वाघ, ५६२, सदाशिव पेठ, चित्रशाळा इमारत, पुणे-४११०३०, द्वितीयावृत्ती, ऑक्टोबर-२०१०.

७) प्रा. डॉ. चाटसे, डॉ. खिल्लारे, डॉ. कांबळे, प्रा. वनंजे श्रावण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौरव ग्रंथ, एज्युकेशनल पब्लिशिंअर्स अँड डीस्ट्रिब्युटर्स, पो.बा. न. १३१, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै-२०२०.

८) गायकवाड सुप्रिया, राष्ट्रवाद, जमातवाद आणि स्त्रिया, बीज प्रकाशन गृह, दा.रा. झुंजारे, रोकडिया नगर, शेगांव, जी. बुलढाणा- ४४४२०३, प्रका. क्र. १२, प्रथम आवृत्ती- २६ मे २०२१.

९) मराठी अनुवाद- प्रा. शिरसाठ प्रकाश, जातीव्यवस्थेचे निर्मूलन-डॉ. आंबेडकर बी. आर., उच्च व तंत्र शिक्षण विभाग- महाराष्ट्र शासन, मुंबई-४०० ०३२, द्वितीय आवृत्ती- २०१८.

१०) डॉ. जाधव नरेंद्र, डॉ. आंबेडकर, आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन-उषा वाघ, ८६१/

१, सदाशिव पेठ, पुणे- ४११ ०३०, प्रथमावृत्ती- ६ डिसेंबर-१९९२.

११) डॉ. दाते सुनील, डॉ. ढोबळे रमेश, प्रमुख राजकीय विचार्यप्रणाली, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद, प्रका. क्र. ६१, द्वितीय आवृत्ती- जून २०००.

१२) संपादक- मून वसंत, प्रा. गोडघाटे, डॉ. कासरे, नरके हरी, कांबळे, द्विती आवृत्ती- प्रा. डोळस अविनाश, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-१, १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र- साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्र. १८, मंत्रालया समोर, मुंबई- ४०० ०२१, द्वितीय आवृत्ती,- १४ एप्रिल-२०१६.

१३) संपादक- मून वसंत, प्रा. गोडघाटे, डॉ. कासरे, नरके हरी, कांबळे, द्विती आवृत्ती- प्रा. डोळस अविनाश, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-२, १९३७ ते १९४५,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र- साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र शासन, शासकीय कुटीर क्र. १८, मंत्रालया समोर, मुंबई- ४०० ०२१, द्वितीय आवृत्ती,- १४ एप्रिल-२०१६.

**संदर्भ ग्रंथ सूची (हिन्दी) :**

१) संपादक- रॉय हिमांशु, भारत मे उपनीवेशवाद और राष्ट्रवाद, हिन्दी माध्यमं कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, १०, केवेलरी लाइन, दिल्ली- ११० ००७, प्रथम संस्करण- जनवरी-२०१३.

२) डॉ. माथुर कृष्णचंद्र, डॉ. माली नारायण, आधुनिक भारत का इतिहास(१७६१-१९७१), जैन प्रकाशन मंदिर, १०२४, चपलावत जैन मैनशन, सिंघीजि का रास्ता, चौदा रास्ता, जयपूर-३०२ ००३, नवीन संस्करण- २०१७.

३) शर्मा बी. एन., राम कृष्णदत्त शर्मा, सविता शर्मा, भारतीय राजनीतीक विचारक, रावत पब्लिशिंग, प्रेम रावट, सत्यम अपार्टमेंट, सेक्शन-३, जवाहर नगर, जयपुर-३०२ ००४, पुनरावृत्ति-२०१९.

४) संपा.-त्यागी रुचि, आधुनिक भारत का राजनैतिक चिंतन, हिन्दी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, १० केवेलरी लाइन, दिल्ली- ११०००७, द्वितीय पुनर्मुद्रण- २०१५, जयपूर-३०२००४, ग्यारावा संस्करण: २०१९.

५) नागर पुरुषोत्तम,आधुनिक भारतीय सामाजिक एव राजनीतीक चिंतन, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, ११वा संस्करण, प्लॉटन. १, झालाणा संस्थानिक क्षेत्र, जयपूर-३०२ ००४.



57